**स.फौ.के. नं. २००/२०२०**

**नि. क्र. १९ लगत**

**<u>अभियोगतर्फे साक्षीदार क्र. ०६ यांचा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**माझे नाव –** संतोष शिवलिंग सडकर,

**वय –** ४२ वर्षे, **व्यवसाय –** नोकरी ( पोलीस हेड कॉन्स्टेबल/१३०९),

**नेमणूक –** दापोली पोलीस ठाणे, ता. दापोली, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगतर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१**. दिनांक ०४/१२/२०१९ रोजी मी देवरुख पोालीस ठाणे येथे पोलिस नाईक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस ठाणे अंमलदार यांनी गुन्हा नोंदणी क्र. १४९/२०१९, भा.दं.वि.चे कलम ४२७, ४४८ अन्वयेचा गुन्हा दाखल करुन तपासाचा आदेश गुन्ह्याची कागदपत्रांसह माझ्याकडे देण्यात आला. त्यामध्ये फिर्यादी रमेश तेटांबे यांनी दिलेली प्रथम खबरी अहवालाची प्रत होती. त्याचे मी अवलोकन केले. त्यानंतर मी घटनास्थळी रवाना झालो. सदरचे घटनास्थळ मच्छीमार्केट देवरुख येथील मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग या इमारतीत होते. तेथे मी दोन पंच योगेश शिंदे व प्रेरणा खेडेकर यांना बोलावून घेतले. त्यांच्या समक्ष मी घटनास्थळ पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. सदरचा पंचनामा १५.१५ ते १६.०५ पर्यंत मी पूर्ण केला. *(साक्षीदारास निशाणी क्र. २४ कडील पंचनामा दाखविला.) तो तोच असून त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.*

**०२**. त्यावेळी घटनास्थळाचा नकाशा रेखाटण्यात येवून तेथील छायाचित्रे घेण्यात आली होती. ती अभिलेखात समाविष्ट करण्यात आली होती. *(साक्षीदारास निशाणी क्र. २५ कडील नकाशा दाखविण्यात आला.) त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. (साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली) ती तीच असून त्यावर*

*माझी स्वाक्षरी आहे. सदरची छायाचित्रे मीच घटनास्थळी घेतलेली होती. (**<u>ओळखीकरिता सदर छायाचित्रांना एकत्रितपणे वस्तू अ</u>** देण्यात येते.)* त्यानंतर मी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवून ते अभिलेखात समाविष्ट केले.

**०३**. त्यानंतर मी आरोपीस तपासकामात हजर राहण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–१–अ अन्वये नोटीस दिली. *(साक्षीदारास सदरची नोटीस दाखविली)*. ती तिच आहे. त्यावर समक्ष म्हणून माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. *(सदर **<u>नोटीसला निशाणी क्रमांक ४८</u>** देण्यात येते)*.

**०४**. वादग्रस्त सदनिका मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग बाबतची खरेदी विक्रीची कागदपत्रे मिळण्यासाठी मी, मा. दुय्यम निबंधक, देवरुख यांना पत्र दिले होते. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविले)*. ते तेच आहे. त्यावर माझी, पोलिस निरीक्षक व मा. दुय्यम निबंधक यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. *(सदर पत्रास **<u>निशाणी क्रमांक ४९</u>** देण्यात येते)*. त्यानुसार प्राप्त झालेली कागदपत्रे मी अभिलेखात समाविष्ट केली.

**०५**. वादग्रस्त सदनिका मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग बाबतची कर आकारणी उता–याची कागदपत्रे मिळण्यासाठी मी, मा. मुख्याधिकारी, नगरपंचायत देवरुख यांना पत्र दिले होते. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविले)*. ते तेच आहे. त्यावर माझी, पोलिस निरीक्षक व मा. मुख्याधिकारी यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. *(सदर पत्रास **<u>निशाणी क्रमांक ५०</u>** देण्यात येते)*. त्यानुसार प्राप्त झालेली कागदपत्रे मी अभिलेखात समाविष्ट केली.

*(गट क्रमांक १८/७ चा सातबारा उता–याची नक्कल, मालमत्ता क्र. ६७२ (११) (१२) चा करआकारणी उतारा व घरपट्टीच्या दोन पावत्या इत्यादी कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यास अभियोग पक्षातर्फे विनंती करण्यात आली. त्यावर बचाव*

*पक्षातर्फे आक्षेप घेण्यात आला की, सदरची कागदपत्रे फिर्यादीकडून शाबित करुन घेतले नसल्याने त्यांना निशाणी क्रमांक देता येणार नाही. अभिलेखावर गट क्रमांक १८/७ चा सातबारा उता-याची नक्कल व मालमत्ता क्र. ६७२ (११) (१२) चा करआकारणी उतारा हा मूळ स्वरुपात दाखल असून मालमत्ता क्र. ६७२ (११) व ६७२ (१२) यांच्या घरपट्टीची नक्कल अभिलेखावर दाखल आहे. सार्वजनिक दस्तऐवज असल्याने ती पुराव्यात वाचता येतील. त्यामुळे बचावपक्षाचा आक्षेप नामंजूर करण्यात येतो.)*

*०६. (**गट क्रमांक १८/७ च्या सातबारा उता-याची नक्कल यास निशाणी क्र. ५१, मालमत्ता क्र. ६७२ (११)(१२) चा करआकारणी उतारा यास निशाणी क्र. ५२ व मालमत्ता क्र. ६७२ (११) च्या घरपट्टीची नक्कल यास निशाणी क्र. ५३ व ६७२ (१२) च्या घरपट्टीची नक्कल यास निशाणी क्र. ५४** देण्यात येते.).*

**०७.** वादग्रस्त सदनिका मार्लेश्वर प्रसाद बिल्डींग संदर्भात फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार झाले होते का, ते निष्पन्न करण्यासाठी बँक ऑफ इंडिया शाखा देवरुख व भारतीय स्टेट बँक, शाखा देवरुख यांना मी पत्र दिले होते. *(साक्षीदारास सदरचे बँक ऑफ इंडिया शाखा देवरुख यांना दिलेले पत्र दाखविले). ते तेच आहे. त्यावर माझी, पोलिस निरीक्षक व बँक ऑफ इंडिया ,शाखा देवरुख यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. (सदर पत्रास **निशाणी क्रमांक ५५** देण्यात येते).* त्यानुसार बँक ऑफ इंडिया, शाखा देवरुख यांनी त्यांच्या पत्रासोबत आरोपीच्या बँक खात्याचे स्टेटमेंट इत्यादी कागदपत्रे दिली होती. ती मी अभिलेखात समाविष्ट केली. *(साक्षीदारास सदरचे भारतीय स्टेट बँक, शाखा देवरुख यांना दिलेले पत्र दाखविले). ते तेच आहे. त्यावर माझी, पोलिस निरीक्षक व भारतीय स्टेट बँक, शाखा देवरुख यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. (सदर पत्रास **निशाणी क्रमांक ५६** देण्यात येते).* त्यानुसार भारतीय स्टेट बँक,

शाखा देवरुख यांनी त्यांच्या पत्रासोबत आरोपीच्या बँक खात्याचे स्टेटमेंट इत्यादी कागदपत्रे दिली होती. ती मी अभिलेखात समाविष्ट केली. *(आरोपीचे बँक खात्याच्या उता–यास **निशाणी क्रमांक ५७** देण्यात येते).*

०८. त्यानंतर दिनांक २५/०६/२०१९ रोजी फिर्यादीचे पुरवणी टिपण नोंदवून ते मी अभिलेखात समाविष्ट केले. *(साक्षीदारास फिर्यादीचे पुरवणी टिपण दाखविले).* ते तेच आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. *(सदर पुरवणी टिपणास **निशाणी क्रमांक ५८** देण्यात येते).*

०९. एकूण झालेल्या तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा आल्याने मी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांचेकडून –**

१०. मी देवरुख पोलिस ठाणे येथे पाच वर्ष कार्यरत होतो. मी निशाणी क्र. ५१ कडील सातबारा उतारा पाहून सांगतो की, त्यावर फिर्यादीचे नाव नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर सातबारा उता–यावर मार्लेश्वर प्रसाद बिल्डींगची नोंद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर सातबारा उता–यावर फिर्यादीसह इतर भागवत आडनाव असलेल्या अनेकांची भोगवटदार म्हणून नावे नोंदविलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर भागवत आडनावाच्या लोकांकडे मी चौकशी केली नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. ५२ कडील कर आकारणी उतारा हा मालमत्ता क्रमांक ६७२/११ व ६७२/१२ चा असून तो फिर्यादीत नमूद असलेल्या सदनिका क्रमांक ९ व १० यांचा नाही. साक्षीदार सांगतो की, फिर्यादीमध्ये अनावधानाने सदनिका क्रमांक ९ व १० असे नमूद झाले असून फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर नंतर

त्याचे पुरवणी टिपण नोंदविण्यात आले आहे.

**१२.** **प्रश्नः** फिर्यादीने त्याच्या सरतपासात परिच्छेद क्रमांक ३ मध्ये सदनिका क्रमांक ९ व १० आरोपीला खरेदी करायच्या आहे, असे कथन केले असून त्याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

**उत्तरः** फिर्यादीने साक्षीत काय कथन केले, त्याबाबत मी सांगू शकत नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीमध्ये अनावधानाने सदनिका क्रमांक ९ व १० असे नमूद झाले असून फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर नंतर त्याचे पुरवणी टिपण नोंदविण्यात आले, हे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनादरीत झालेला धनादेश मी फिर्यादीकडून हस्तगत केला नाही.

**१४.** **प्रश्नः** तसे करण्यास तुम्हाला कोणती अडचण नव्हती, हे बरोबर आहे का?

**उत्तरः** धनादेश जप्त करणे मला योग्य वाटले नाही.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, सावर्डे ते देवरुख हे अंतर दिड तासांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे फिर्यादीने १२.५८ च्या सुमारास फिर्याद नोंदविणे शक्य नाही. सदर घटनास्थळी फिर्यादीच्या कथनानुसार तोडलेली कुलपे घटनास्थळी नसल्याने मी ती जप्त केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदरची तोडलेली कुलुपे मी आरोपीच्या ताब्यातून देखील जप्त केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने सदनिकांचे कुलूप तोडून त्यामध्ये अतिक्रमण केलेलेच नाही. हे मी सांगू शकत नाही की, फिर्यादीने आरोपीविरुध्द दाखल केलेला दिवाणी दावा न्यायालयाने खारीज केला आहे अगर कसे.

**१६.** हे मी सांगू शकत नाही की, धनादेश अनादरीत झाल्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी तक्रार दाखल केली नाही अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार प्रेरणा खेडेकर हिने पंच म्हणून काम पाहिल्याचे तिच्या

तपासटिपणात नमूद केले नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने रीतसर धनादेश देवून सदनिका क्रमांक ९ व १० यांचा रितसर ताबा घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, देवरुख मधील सदनिकांचे बाजारभाव वाढल्याने हव्यासापोटी फिर्यादी सदनिकांचा ताबा आरोपीला देण्यास तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला बेकायदेशीरपणे हुसकावून लावण्यासाठी प्रस्तुतचा खोटा खटला तयार करण्यात आला आहे.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. २४ व २५ कडे घटनास्थळ पंचनामा व नकाशा प्रत्यक्ष जागेवर जावून न करता पोलिस ठाण्यात बसून तयार केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, छायाचित्रे काढल्याबाबतचे भा.पु.का.क. ६५ ब चे प्रमाणपत्र मी सादर केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, भारतीय स्टेट बँक व बँक ऑफ इंडिया यांच्याकडील कागदपत्रे खोटी व बनावट तयार केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा सदनिका क्रमांक ११ व १२ चा असून ९ व १० चा नाही. हे म्हणणे खरे नाही की, नकाशा काढण्याचे मी कोणतेही प्रशिक्षण घेतलेले नाही.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची सदर मालमत्तेची मालकी दर्शविण्याकरिता त्याच्या नावाचे खरेदीखत मी हस्तगत केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, नेहमीच्याच पंचांना घेवून घटनास्थळ पंचनामा करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी प्रकरणाचा वाद असताना खोटी तक्रार घेवून खोटा खटला दाखल करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा करताना रेखा तेटांबे तेथे हजर नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात नमूद केलेले सर्व कागदपत्रे खोटी व बनावट आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या दबावाखाली येवून आरोपीकडून फिर्यादीला सदर सदनिकांचा ताबा देण्यासाठी खोटी तक्रार दाखल करुन घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर मी खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे

खरे नाही की, चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.06.05 18:09:37 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांक – ०५/०६/२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K.K.Bhingarde (Jr. clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) &<br>Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of evidence | :- | 05/06/2026 |
| evidence signed by PO. on | :- | 05/06/2026 |
| evidence uploaded on | :- | 05/06/2026 |